# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०७/०७/२०१९

## दि.०६/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३३५/१९,भादविक ३०७,५०४ |
| **फिर्यादी** | सौ.कुंदा देविदास बेलुसे,वय-५० वर्षेरा.जनता वसाहत,पर्वती,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,वय-२७ वर्षे,रा.गल्ली क्र.७१,मधला टप्पा,जनता वसाहत,पर्वती,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०७/२०१९ रोजी २२/०० वा.गल्ली क्र.७१,मधला टप्पा,जनता वसाहत,पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादीं यांचे नंणदेचा मुलगा यातील नमुद इसम हा त्यांचे घरा मध्ये त्याची बायको किर्ती व त्याची आई बरोबर भांडणे करीत असताना,फिर्यादीं यांचे पती देविदास तुकाराम बेलुसे,वय-६२ वर्षे,धंदा-रिक्षा चालक,रा.गल्ली नंबर ६९,मधला टप्पा,जनता वसाहत,पर्वती, पुणे हे त्यांचे घरी जावुन मयुर यास घरात कशाला भांडणे करतो,वेडयासारखा वागत जावु नकोस चांगले वागावे असे समजुन सांगत असताना,मयुर याने चिडून जावुन,देविदास यांना शिवीगाळ करून,कोयत्याने त्यांचे डोक्यात मारुन,गंभीर दुखापत करुन,त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एन.आर.केंचे ८५५४००११३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६२/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ महिला,वय-७४ वर्षे,रा.प्रभात नगर,डेक्कन,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०१९ रोजी सकाळी ११/३० वा.पातेश्वर सुपर शॉपी समोर गुळवणी महाराज रोड, एरंडवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसोबत दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल,एरंडवणे,पुणे येथे उपचार करुन घरी परत पायी जात असताना,किराणा घेण्यासाठी पातेश्वर सुपर शॅापी जवळ आले असताना,समोरच्या दिशेने एका दुचाकीवरुन आलेल्या एका अनोळखी इसमाने,फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांचे गळयातील ६०,००० /- रु किंचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. साळवे ९५५२५७०७११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ६१८/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-७२ वर्षे,रा.ससाणेनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम - उंची ५ फुट, चेहरा गोल, नाक सरळ, गव्हाळ रंगाचा, अंगात पांढरा शर्ट पॅट घातलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०७/१९ रोजी सकाळी १०/०० ते १०/३० वा सुमारास फिर्यादीचे राहते घरातुन |
| **तपशिल** | यातील नमुद एका अनोळखी वर्णनाचे इसमाने फिर्यादी यांचे राहते घरी येवुन,त्यांना सोन्याचे दागिने पॉलीश करुन देतो असा बहाणा करुन,त्यांचा विश्वास संपादन करुन, फिर्यादी यांचे जवळील सोन्याचे दागिने ४८ हजार रू किचे पॉलीश करण्याचे बहाण्याने घेवुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सह.पो.निरी. चव्हाण ७०३८१९९३०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २८३/१९,भादविक ३१७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३१,धंदा-समाजसेवीका,रा.वॉर्ड नं.३१/३२,ससून हॉस्पिटल,पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय-३०,रा.किनगावता,बुलढाणा,जि.बुलढाणा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०६/२०१९ रोजी ससुन हॉस्पिटल,पुणेचे परिसरात |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,नमुद महिलेने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन एक पुरूष जातीचे जन्मलेले नवजात अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,त्याचे पालक त्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,उघडयावर परित्याग करण्याचे उद्देशाने टाकुन निघुन गेली,म्हणुन सदर महिले विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पाटील ९५९४०००११८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**